## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक - २०२/२०२२/नंदुरबार**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. संतोष आनंदा जाधव,<br>रा. प्लॉट नं. १७, आकाश मोगरा कॉलनी,<br>नळवा रोड, नंदुरबार, ता. जि. नंदुरबार. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी तथा<br>प्रथम लिपीक,<br>जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालय,<br>नंदुरबार, ता. जि. नंदुरबार. | : | प्रतिवादी |
| २ | प्रथम अपिलीय अधिकारी तथा,<br>जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख,<br>जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख यांचे कार्यालय,<br>नंदुरबार, ता. जि. नंदुरबार. | : | प्रतिवादी |

**सुनावणी दिनांक - ०८/१२/२०२२**

अपिलार्थी यांनी दिनांक २८/१२/२०२१ रोजीच्या अर्जान्वये राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिल दाखल केले असून त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली नाही, असे कारण नमूद केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी दिनांक ०८/१२/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती.

**सुनावणीसाठी उपस्थित** - सर्व पक्षकार उपस्थित होते.

अपिलार्थी यांनी दिनांक १७/०५/२०२१ रोजीच्या माहिती अर्जान्वये श्री. महेश खडतरे हे जिल्हा अधींक्षक भुमी अभिलेख, नंदुरबार या पदावर हजर झाल्यापासुन ते दिनांक १७/०५/२०२१ या कालावधीतील दैनंदिनी दौरा कार्यक्रम तसेच जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख पदाचे सारसंग्रहणी प्रमाणे कामकाज बाबत माहिती, जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख यांनी दरमहा किती कामकाज पार पाडण्याबाबतचे कागदपत्रे तसेच जिल्हा अधींक्षक भुमी अभिलेख, नंदुरबार यांचेकडील प्रलंबित अपील प्रकरणेबाबत माहिती मागितली होती. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीना दिनांक २३/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये असे कळविले आहे की, जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, नंदुरबार यांनी दिनांक १४/०६/२०२१ रोजी दिलेल्या लेखी खुलासा नुसार दैनंदिनी व दौरा कार्यक्रम माहिती ही त्यांची वैयक्तिक स्वरुपाची असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१) (जे) नुसार देता येत नाही, तसेच जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, नंदुरबारयांचेकडील प्रलंबित अपील प्रकरणेबाबत माहिती ही प्रश्नार्थ स्वरुपाची माहिती असल्याने माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कायद्यात प्रश्नार्थक स्वरुपाची माहितीस उत्तर तयार करुन देण्याची तजवीज नाही, त्यामुळे सदरची माहिती आपणांस कार्यलयाकडुन पुरविता येऊ

शकत नाही. जिल्हा अधीक्षक भुमि अभिलेख पदाचे सारसंग्रणी प्रमाणे कामकाजाबाबतची कागदपत्रे/माहिती आपणांस पुरवित असुन सदर कागदपत्रांची एकुण रुपये ६/- माहिती शुल्क भरणा करुन समक्ष पावती जमा करावी.

तद्नंतर अपिलार्थी यांनी दिनांक १८/०६/२०२१ रोजीच्या अर्जान्वये प्रथम अपिल दाखल केले. सदर प्रथम अपिलावर दिनांक १३/०८/२०२१ रोजीसुनावणीची तारीख नेमली, परंतु अपरिहार्य कारणास्तव सदरची सुनावणी झाली नाही. त्यानंतर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांची दिनांक ०६/०९/२०२१ रोजी बदली झाल्याने सदरचा अतिरिकत पदभार जिल्हा अधीक्षक भुमी अभिलेख, धुळे यांचेकडे सोपविण्यात आला. त्यानंतर दिनांक २३/११/२०२१ रोजी सुनावणी घेऊन मुद्दा क्र. १ बाबत अपिलार्थी यांना सदरची माहिती पुरविता येत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले योग्य आहे, मुद्दा क्र. २ प्रमुख लिपीक तथा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना दिनांक २३/०६/२०२१ रोजी पुरविलेली आहे. मुद्दा क्र. ३ जन माहिती अधिकारी १० दिवसांचे आत विनामुल्य माहिती पुरवावी. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९/१२/२०२१ रोजीच्या पत्रानवये मुद्दा क्र. ३ बाबत माहिती कार्यालयातील वार्षिक प्राप्त अपील प्रकरणे, निकाली प्रकरणे अपिलांची माहिती विनामुल्य पुरविली व अपील प्रकरणे सुनावणी घेऊन निकाली करण्यास उशिर झाल्याबाबत कारणे कार्यालयात उपलब्ध नाही, तसेच आपणांस सदरची माहिती शासनाची http://eqjcourts.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे त्याचे अवलोकन करावे, असे कळविले.

सुनावणीदरम्यान विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांचा दिनांक १७/०५/२०२१ रोजीचा माहिती अर्ज होता. त्यानुसार अपिलार्थीस २३/०६/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयातील उपलब्ध माहितीबाबत तसेच इरत माहितीचे माहिती शुल्क भरण्याबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे, तद्नंतर अपिलार्थी यांनी माहिती शुल्क भरल्यानंतर माहिती पुरविली आहे. तसेच तत्कालीन प्रथम अधिकारी यांनी सांगितले की, अपिलार्थी यांनी दिनांक १८/०६/२०२१ रोजी प्रथम अपिल दाखल केल्यानंतर सदर अपिलावर दिनांक १३/०८/२०२१ रोजी सुनावणी आयोजित केली, मात्र सदर सुनावणी काही कारणास्तव झाली नाही, त्यानंतर त्यांची बदली झाली असल्याने श्रीमती स्वाती लोंढे यांनी पदभार स्विकारल्यानंतर त्यांनी सदर प्रथम अपिलावर दिनांक २३/११/२०२१ रोजी सुनावणी घेऊन आदेश पारित केलेले आहेत. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०९/१२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये कार्यालयातील उपलब्ध माहितीबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर कळविले आहे. तसेच अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान आयोगास सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली मात्र अपुर्ण मिळाली. तसेच मुद्दा क्र. १ ची माहिती मिळाली नाही. मला मुद्दा क्र. १ ची माहिती नाकारली आहे.

सुनावणीदरम्यानचा युक्तिवाद व आयोगास सादर करण्यात आलेली कागदपत्रे विचारात घेता असे दिसून आले की, अपिलार्थी यांच्या दिनांक १७/०५/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीस विहित मुदतीत उपलब्ध माहितीबाबत वस्तुस्थितीदर्शक उत्तर तसेच इतर माहितीबाबत माहिती शुल्क भरणा करण्याबाबत कळविले असल्याचे स्पष्ट होते. तसेच प्रथम अपिलाच्या